# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.

## प्रेसनोट

दिनांक १३/०१/२०२२

**“ सामाजिक सुरक्षा विभाग यांचे पथकाने अवैधरित्या शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची पानटपरीमध्ये साठवणुक करुन विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई केलेबाबत.”**

मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सामाजिक सुरक्षा पथक हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक १२/०१/२०२२ रोजी पिंपरी पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची पानटपरीमध्ये साठवणुक करुन विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक १२/०१/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी पिंपरी पोलीस स्टेशन हद्दीत तपोवन रोड, माऊली चहा हॉटेलचे शेजारी माऊली पान शॉप, पिंपरी, पुणे येथे इसम नामे वामन पाटील हा त्याचे पान टपरीमध्ये तसेच टपरीचे पाठीमागे असलेल्या शॉपमध्ये गुटख्याची साठवणुक करुन त्याची पिंपरी परिसरामध्ये स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी विक्री करत आहे. अशी गुप्तबातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी पिंपरी पोलीस स्टेशन हद्दीत सापळा रचुन १४:४५ वा चे सुमारास छापा टाकुन खालील मुद्देमाल आरोपीच्या ताब्यात मिळुन आला त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) ३,०९०/- रु रोख रक्कम
२) १,३५,१८६/- रु किं चा प्रतिबंधित गुटखा.

---------------------------------

**असा एकुण १,३८,२७६/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे १) वामन रोहीदास पाटील वय ४३ वर्षे रा. स्वप्नपुर्ती अपार्टमेंट, फ्लॅट नंबर ५०५, वाघेरे कॉलनी नंबर ०३, पिंपरी गांव, पुणे **तसेच पाहिजे आरोपी नामे** २) मिथुन पुर्ण नाव माहित नाही वय ४० वर्षे रा. डुल्ल्या मारुती चौक, गणेश पेठ, पुणे यांचेविरुध्द पिंपरी पोलीस स्टेशन येथे गुरनं २२/२०२२ भादंवि कलम ३२८, २७२, २७३, १८८, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास पिंपरी पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अप्पर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. काकासाहेब डोळे, मा. सहा. पोलीस आयुक्त डॉ. श्री. प्रशांत अमृतकर, पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. डॉ. अशोक डोंगरे, पोउपनि प्रदिपसिंग सिसोदे पोलीस अंमलदार विजय कांबळे, किशोर पढेर, सुनिल शिरसाट, नितीन लोंढे, मारुती करचुंडे, गणेश कारोटे, संगिता जाधव, सोनाली माने, योगेश तिडके यांनी केली आहे.


puma